क्रमांक ससाका १०९५/१८४७०/सीआर-१५३/३-सी,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२,
दिनांक ३० मार्च १९९६.

वाचावे :

१) शासन आदेश क्रमांक सीएसके-१०७४/७०४९/१३-सी, दि.१०.०६.१९७६ चे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९-अ खालील आदेश.
२) शासन आदेश क्रमांक शाभाभां-१०८६/सीआर-१५९/३-सी, दि.२१.०७.१९८८
३) आदेश क्रमांक ससाका-३२९०/८३६२/प्र.क्र.५६/३-सी, दिनांक १४.०१.१९९४
४) शासन निर्णय क्रमांक ससाका-३९९५/प्र.क्र.१९०/३-सी, दि. ०६ जानेवारी १९९६
५) शासन निर्णय क्र. ससाका-१०९४/४/९५८/सीआर-१९२/३-सी, दि. ०९ व ३१ जानेवारी १९९६.
६) शासन निर्णय क्र. ससाका-१०९५/१८४७०/प्र.क्र.१५१/३-सी, दि.३१ जाने.९६ व ०१ फेब्रु. १९९६.

आ दे श

ज्याअर्थी सहकारी कार्यक्रम योग्य राबविणे शक्य व्हावे, महाराष्ट्र राज्यातील सहकारी साखर कारखान्यांचे व्यवहाराचे व्यवस्थापन योग्य रितीने व्हावे जेणेकरुन सहकारी साखर कारखान्यांचे व्यवहार ज्यांच्या हितास बाधा येणार नाही अशा पध्दतीने चालविणे गरजेचे आहे.

आणि ज्याअर्थी वरील बाबींची अंमलबजावणी होणे शक्य व्हावे याकरिता शासन आदेश क्रमांक सीएसके-१०७४/७०४९/१३-सी, दिनांक १०.०६.१९७६ अन्वये शासनाने महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० च्सर जू ७९-अ अंतर्गत विशिष्ठ आर्थिक मर्यादेच्या वरच्या रकमांची स्थापत्य कामे आणि यंत्रसामुग्री खरेदीसंबंधी निरनिराळया पातळीवर समित्या गठीत केल्या होत्या.

आणि ज्याअर्थी शासनाने वेळोवेळी आवश्यकतेनुसार त्या समित्यात फेरबदल करुन आदेश पारीत केले आहे.

आणि ज्याअर्थी स्थापत्या बांधकामे, यंत्रसामुग्री खरेदी हया सहकारी साखर कारखान्यांचे हित जोपासले जावे त्यात सुसुत्रता राहावी हयाकरिता सुधारीत आदेश काढणे गरजेचे झाले आहे.

त्याअर्थी स्थापत्या बांधकामे, यंत्रसामुग्री खरेदीच्या संदर्भात वेळोवेळी गठीत केलेल्या समित्या रद्द करणेत येत असून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७९-अ अंतर्गत १९६० शासनास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन पुढील नमुद केल्याप्रमाणे समित्या पुर्नगठीत करण्यात येत आहेत.

१) सहकारी साखर कारखाना पातळीवरील स्थापत्या यंत्रसामुग्री खरेदी.

| | |
|---|---|
| स्थापत्य बांधकामे | रु.१०.०० लाख |
| यंत्रसामुग्री खरेदी | रु.२५.०० लाख |

२) स्थापत्य बांधकामाचे मुल्यांकन रु.१०.०० लाखाचे वर असल्यास निविदा ऑि... खरेदीसंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार खालील समितीस राहतील.

| | |
|---|---|
| १) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे. | अध्यक्ष |
| २) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बाधकाम, पुणे | सदस्य |
| ३) साखर संचालक | सदस्य |
| ४) महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म. मुंबई | सदस्य |
| ५) संबधित साखर कारखान्यांचे अध्यक्ष/प्रतिनिधी | सदस्य |
| ६) कार्यकारी अभियंता, साखर आयुक्तालय महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य सचिव |

साखर आयुक्तालयातील कार्यकारी अभियंता यांनी सचिव या नात्याने बांधकामाच्या निविदांच्या ... आवश्यक ती माहिती तसेच आर्थिक व तांत्रिक मुल्यामापनाचे विवरणपत्र समितीच्या ...साठी सादर करावे आणि समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करावी.

३) यंत्रसामग्री खरेदी दर रु. २५.०० लाखाचे वर असल्यास त्या खरेदी संबधी निविदा स्विकारण्या अंतिम निर्णय खालील समिती करेल.

| | | |
|---|---|---|
| १) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे. | | अध्यक्ष |
| २) साखर संचालक (अर्थ) | | सदस्य |
| ३) वसंतदादा साखर संशोधन संघाचे तांत्रिक अधिकारी. | | सदस्य |
| ४) राष्ट्रीय सहकारी साखर संघाचे तांत्रिक अधिकारी | | सदस्य |
| ५) संबधित कारखान्याचे अध्यक्ष | | सदस्य |
| ६) संबधित कारखान्याचे कार्यकारी संचालक | | सदस्य |
| ७) कार्यकारी अभियंता (साखर) | | सदस्य सचिव |

४) नविन सहकारी साखर कारखान्यांची यंत्रसामुग्रीचे खरेदीसंबधी निर्णय खालील समिती करेल.

| | |
|---|---|
| १) मा. सहकार मंत्री | अध्यक्ष |
| २) मा. वित्तमंत्री | सदस्य |
| ३) प्रधान सचिव (वित्त) | सदस्य |
| ४) सचिव नियोजन | सदस्य |
| ५) प्रधान सचिव (सहकार) | सदस्य |
| ६) कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य.सहकारी बँक, मुंबई | सदस्य |
| ७) महाराष्ट्र राज्य, सहकारी साखर कारखाना संघ म. मुंबई अध्यक्ष/प्रतिनिधी | सदस्य |
| ८) संबधित कारखान्याचे अध्यक्ष | सदस्य |
| ९) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे. | सदस्य |
| १०) साखर संचालक | सदस्य सचिव |

वरील समितीच्या कार्यकक्षा सोबत विवरणपत्र अ मध्ये जोडलेल्या आहेत.

शासन असेही आदेश देत आहे की, वरीलपैकी कोणतीही समिती आवश्यक वाटल्या एखादा मुद्या शासनास आवश्यक त्या निर्णयास पाठवु शकेल आणि त्यावर शासनाचा निर्णय अंतिम राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

स्वाक्षरी/-
(ग. रा. साळवी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

प्रत :

मा. मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव.
मा. राज्यमंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव.
प्रधान सचिव (वित्त) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
प्रधान सचिव (सहकार) सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
अप्पर मुख्य सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
साखर आयुक्त , महाराष्ट्र राज्य, पुणे.
आयुक्त सहकार व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साखर कारखाना संघ ,मुंबई
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई
संचालक, वसंतदादा संशोधन संस्था, मांजरी, पुणे.
कार्यकारी संचालक, राष्ट्रीय सहकारी साखर संघ, नवी दिल्ली
सर्व प्रादेशिक सह संचालक (साखर)
उपसचिव (सचिव) सहकार व वस्त्रोद्योग विभाग
कक्ष अधिकारी, ३ सी, १३ सी, सहकार व वस्त्रोद्योग विभाग.